खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## विद्यार्थी विकास मंडळ : निर्भय कन्या अभियान

प्रभात

# मन, मेंदू, मनगटात ताकद निर्माण करा

## देवेंद्र बुट्टे पाटील : राजगुरू महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान

**राजगुरूनगर, दि. २७ (प्रतिनिधी)** - कायद्याने महिलांना संरक्षण आणि न आवडणारी गोष्ट नाकारण्याचा अधिकार दिला आहे. मुलींनी आई - वडिलांचा विश्वास सार्थ ठरवताना आपल्या मन, मेंदू, मनगटात ताकद निर्माण करून स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय निर्भय कन्या अभियानाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी ॲड. मनीषा टाकळकर, कराटे प्रशिक्षिका काजल बोर्हाडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले, मुलींनी शिक्षणाच्या माध्यमातून निर्भय व निर्भर व्हावे. मुलींचे शिक्षण व सुरक्षिततेला संस्थेचे प्राधान्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

ॲड. मनीषा टाकळकर यांनी स्त्री हक्क-अधिकार विषयक नियम, संहिता कायदे या विषयावर बोलताना विद्यार्थिनींनी मानसिक, बौद्धिक व शारीरिक दृष्टीने सक्षम असणे आवश्यक असल्याचे सांगितले. महिलांना समानतेचा अधिकार राज्यघटनेने दिला आहे त्यामुळे महिलांसाठी असणार्या कायद्यांविषयी जागृत राहून योग्य निर्णय घ्यायला हवा. विद्यार्थिनींनी कोणत्याही अन्याय, अत्याचार किंवा दबावाला बळी न पडता आपल्या अंगभूत क्षमतांचा विकास करून निर्भयपणे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कराटे प्रशिक्षिका काजल बोर्हाडे यांनी महिला स्वसंरक्षण या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षणाची प्रात्याक्षिके सादर केली. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थिनींना स्वतःबद्दलचा आदर आणि चारित्र्य जपण्याचे आवाहन केले. या अभियानात सुमारे २०० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. सोनल धानापूने, परिचय प्रा. जयश्री गोगावले यांनी तर प्रास्ताविक व आभार डॉ.

Pune Gramin Edition
Feb 28, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com



रुवार 26 फरवरी 2026
bhaskarhindi.com

5

# मन, मस्तिष्क और कलाई में शक्ति विकसित करें

**भास्कर न्यूज** | राजगुरुनगर. छात्राओं को मन, मस्तिष्क और कलाई में शक्ति विकसित कर स्वयं को सिद्ध करना चाहिए तथा माता-पिता के विश्वास पर खरा उतरना चाहिए। यह आह्वान खेड़ तहसील शिक्षण प्रसारक मंडल के अध्यक्ष एड. देवेंद्र बुट्टे पाटिल ने किया। वे सावित्रीबाई फुले पुणे यूनिवर्सिटी और विद्यार्थी विकास मंडल और हुतात्मा राजगुरु कॉलेज के संयुक्त तत्वावधान में आयोजित एक दिनी 'निर्भय कन्या अभियान' के उद्घाटन समारोह में बोल रहे थे।

# महिलांनी स्वतःला सिद्ध करावे

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांचे आवाहन

राजगुरूनगर : आपण पुरुषप्रधान संस्कृतीत वावरत असलो तरी कायद्याने महिलांना संरक्षण आणि न आवडणारी गोष्ट नाकारण्याचा अधिकार दिला आहे. मुलींनी आई-वडिलांचा विश्वास सार्थ ठरवताना आपल्या मन मेंदू मनगटात ताकद निर्माण करून स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय निर्भय कन्या अभियानाच्या उदघाटन कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी अ‍ॅड. मनीषा टाकळकर, कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते. अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, मुलींनी शिक्षणाच्या माध्यमातून निर्भय व निर्भर व्हावे. मुलींचे शिक्षण व सुरक्षिततेला संस्थेचे प्राधान्य असल्याचेही त्यांनी सांगितले. अ‍ॅड. मनीषा टाकळकर यांनी स्त्री हक्क-अधिकार विषयक नियम, संहिता कायदे या विषयावर बोलताना विद्यार्थिनींनी मानसिक, बौद्धिक व शारीरिक दृष्टीने सक्षम असणे आवश्यक असल्याचे सांगितले. महिलांना समानतेचा अधिकार राज्यघटनेने दिला आहे. त्यामुळे महिलांसाठी असणाऱ्या कायद्यांविषयी जागृत राहून योग्य निर्णय घ्यायला हवा. विद्यार्थिनींनी कोणत्याही अन्याय, अत्याचार किंवा दबावाला बळी न पडता आपल्या अंगभूत क्षमतांचा विकास करून निर्भयपणे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे यांनी महिला स्वसंरक्षण या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षणाची प्रात्याक्षिके सादर केली. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थिनींना स्वतः बद्दलचा आदर आणि चारित्र्य जपण्याचे आवाहन केले. या अभियानात सुमारे २०० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. सोनल धानापूने यांनी, परिचय प्रा. जयश्री गोगावले यांनी, तर प्रास्ताविक व आभार डॉ. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

# मन, मेंदू, मनगटात ताकद निर्माण करा : देवेंद्र बुट्टे पाटील

## राजगुरू महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** आपण पुरुषप्रधान संस्कृतीत वावरत असलो तरी कायद्याने महिलांना संरक्षण आणि न आवडणारी गोष्ट नाकारण्याचा अधिकार दिला आहे. मुलींनी आई-वडिलांचा विश्वास सार्थ ठरवताना आपल्या मन मेंदू मनगटात ताकद निर्माण करून स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय निर्भय कन्या अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी मनीषा टाकळकर, कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. योगेश वाळुंज उपस्थित होते.

देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले, मुलींनी शिक्षणाच्या माध्यमातून निर्भय व निर्भर व्हावे. मुलींचे शिक्षण व सुरक्षिततेला संस्थेचे प्राधान्य असल्याचेही त्यांनी सांगितले. मनीषा टाकळकर यांनी स्त्री हक्क-अधिकार विषयक नियम, संहिता कायदे या विषयावर बोलताना विद्यार्थिनींनी मानसिक, बौद्धिक व शारीरिक दृष्टीने सक्षम असणे आवश्यक असल्याचे सांगितले. महिलांना समानतेचा अधिकार राज्यघटनेने दिला आहे त्यामुळे महिलांसाठी असणाऱ्या कायद्यांविषयी जागृत राहून योग्य निर्णय घ्यायला हवा. विद्यार्थिनींनी कोणत्याही अन्याय, अत्याचार किंवा दबावाला बळी न पडता आपल्या अंगभूत क्षमतांचा विकास करून निर्भयपणे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे यांनी महिला स्वसंरक्षण या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षणाची प्रात्याक्षिके सादर केली. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थिनींना स्वतः बद्दलचा आदर आणि चारित्र्य जपण्याचे आवाहन केले.

या अभियानात सुमारे २०० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. सोनल धानापूने, परिचय प्रा. जयश्री गोगावले यांनी तर डॉ. प्रतिमा लोणारी यांनी आभार मानले.

दै. केसरी



डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख